# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील जाहिरात कंपन्याकडून अनियमितता झाल्याबाबत

**(१) ५७६३५ (०९-०५-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील जाहिरात कंपन्याकडून अनियमितता झाल्याने जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी जाहिरात कंपनीवर कारवाई करण्याबाबतचे किवा सदर कंपन्यांचे ठेके रद्द करण्याबाबतचे आदेश नगरपरिषद प्रशासनाला दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार नगरपरिषद प्रशासनाने कोणकोणत्या जाहिरात कंपन्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) संबंधित कंत्राटदाराने नगरपरिषदेच्या करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे रक्कमांचा भरणा न केल्याने करारनाम्याचा भंग झाल्यामुळे कंत्राट रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच थकीत रकमेच्या वसुलीबाबत संबंधित कंत्राटदाराविरुध्द मे.दिवाणी न्यायालय, कल्याण (वरिष्ठ स्तर) येथे सिव्हील सुट दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लांजा (जि.रत्नागिरी) शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याबाबत

**(२) ५७६८७ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी लांजा नगरपंचायतीच्या डंम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न जागेअभावी गत तीन वर्षापासून प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीने डंम्पिंग ग्राऊंडसाठी प्रस्तावित केलेल्या धुंदरे आणि कोत्रेवाडी येथील जागेला ग्रामस्थांचा विरोध असल्यामुळे सद्यःस्थितीत भाड्याच्याच जागेवर शहरातील कचरा टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन लांजा नगर पंचायतीच्या डंम्पिंग ग्राऊंडच्या व्यवस्थापनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) लांजा नगरपंचायत क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मौजे लांजा, धुंदरे येथील जागेसाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. परंतू सदर जागेविरुध्द सर्वसाधारण सभेने स्थगिती दिली. तदनंतर सदर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ५ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी मौजे लांजा, कोत्रेवाडी येथील जागेस जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिली. दरम्यानच्या कालावधीत सदर जागेत प्रकल्प उभारणी विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे पिटीशन दाखल करण्यात आल्यामुळे पुढील कार्यवाही प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिव्यांगासाठी शासनाकडून कर्ज योजना कार्यान्वित असूनही निधी उपलब्ध झाला नसल्याबाबत**

**(३) ५७९०६ (२६-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी त्यांना मदत करण्याकरता राज्य शासनाकडून दिव्यांग महामंडळाची स्थापना करण्यात आली असून मागील दोन-तीन वर्षात एकाही दिव्यांगाला कर्ज मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांगाना शासनाकडून कर्ज योजना कार्यान्वित केली असून आयुक्तालयामध्ये शासनाकडून निधी उपलब्ध झाला नसल्याचे ही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुंषगाने दिव्यांग व्यक्तीकरिता तात्काळ निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडून दिव्यांगासाठीच्या विशेष शाळा/कार्यशाळा संलग्न वसतिगृहे / मतिमंदासाठीची बालगृहे संलग्न वसतिगृहे यांचे कामकाज हाताळले जाते.
थेट कर्ज योजना ही दिव्यांग वित्त व विकास महामंडळाकडून राबविली जाते व त्यासाठी महामंडळाला शासनाकडून भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(३) महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटी होते. त्यापैकी ४७.५२ कोटी महामंडळाला वितरीत करण्यात आले होते.
सन २०१८-१९ पासून भागभांडवलाची अर्थसंकल्पीय तरतूद केली असली तरी, भागभांडवल मर्यादेमुळे निधी वितरीत करण्यात आली नाही. परिणामी राज्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना महामंडळाकडून थेट कर्ज योजनेतंर्गत कर्ज वितरीत करण्यात आले नाही. शासन निर्णय, दिनांक ०८ जून, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटीवरुन रुपये ५०० कोटी करण्यात आले असून सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता महामंडळाच्या भागभांडवलासाठी रुपये ७ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.रत्नागिरी) नगरपालिकेतील अस्थाई सफाई कर्मचाऱ्यांना थकीत वेतन अदा करण्याबाबत

**(४) ५७९८२ (२४-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) नगरपालिकेतील अस्थाई सफाई कर्मचाऱ्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन अदा केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना वेतन वेळेवर अदा न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच खेड नगरपालिकेचा स्वनिधी व अन्य योजनांमध्ये गुंतवणूक केलेल्या निधीचा गैरवापर झाला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांना त्यांचे थकीत वेतन अदा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :**

(१) व (२) खेड नगरपरिषदेच्या आस्थापनेवर अस्थायी सफाई कर्मचारी या पदावर १४ कर्मचारी कार्यरत असून त्यांचे माहे डिसेंबर, २०२२ (पेड इन जानेवारी, २०२३) पर्यंत वेतन अदायगी करण्यात आली आहे.

(३) व (४) खेड नगरपरिषदेच्या वाहनांकरीता इंधन पुरवठा करण्यासाठी स्वनिधीतून करण्यात आलेल्या कामात अनियमितता झाली, ही वस्तूस्थिती आहे. सदर प्रकरणी नगरपरिषदेचे तत्कालिन लिपिक, वाहन विभाग, तसेच तत्कालिन नगराध्यक्ष यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांद्रा-कुर्ला संकुल ते सी.एस.टी.एम.मार्ग यांना जोडणाऱ्या डी.पी मार्गाचे प्रलंबित काम पुर्ण करण्याबाबत

**(५) ५८१२२ (२४-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांद्रा-कुर्ला संकुल ते सी.एस.टी.एम. मार्ग यांना जोडणाऱ्या डी.पी. मार्गाचे काम ९० टक्के पुर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित अतिक्रमण हटविण्याची व जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, उर्वरित लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करुन सदर रस्ता वाहतूकीसाठी खुला करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी उर्वरित रस्त्याचे काम पुर्ण करुन रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) रस्त्याने बाधित होत असलेली बांधकामे / अतिक्रमणे हटविणे व जमिन अधिग्रहण प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. जमिन अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण होताच व अतिक्रमणे हटविताच उर्वरीत लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करुन सदर रस्ता हा वाहतुकीसाठी अतिशिघ्र खुला करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील सांतांक्रुझ (पूर्व) येथील कलिना सुंदर नगर नाल्याचे काँक्रीटीकरण करण्याबाबत

**(६) ५८१७९ (२६-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ (पूर्व) येथील कलिना सुंदर नगर मधील पर्जन्य जल वाहिनीतील पाण्याचा निचरा डानी वुल्टेक्स नाल्यामधून होत असून सदर नाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) हददीतून पुढे मिठी नदीला जाऊन मिळत असून प्राधिकरणाच्या हद्दीतील उक्त नाला हा कच्चा स्वरुपाचा असल्यामुळे आजुबाजूच्या परिसरातील माती नाल्यामध्ये पडून वारंवार पाणी तुंबत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सी.एस.टी मार्गावर थोडया प्रमाणात देखील पाऊस पडला तरी पाण्याचा निचरा होत नसून रस्त्यावर पाणी साचते, त्यामुळे प्रचंड वाहतूकीची कोंडी होते सबब सदर नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करुन नाला पक्का स्वरुपात म्हणजेच सिमेट काँक्रिटीकरण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाचे अभिप्राय असतांनाही नाल्याचे पक्क्या स्वरुपात बांधकाम अद्यापपर्यंत न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी-टेक्स्ट ब्लॉकमधील सदर नाल्याचे downstream कडील बांधकाम प्राधिकरणाने पुर्ण केले असून उर्वरीत upstream कडील बाजूचे बांधकाम प्रभाव क्षेत्रात मध्ये येणाऱ्या विकासनातून संबंधिताकडून जमा होणारा यथाप्रमाण (Prorata basis) निधीची वसूली होताच प्राधिकरणामार्फत बांधकामाचे काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

### संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत लाभार्थ्यांकडून उत्पन्न प्रमाणपत्र न घेण्याबाबत

**(७) ५८३५७ (२६-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत प्रत्येक वर्षी लाभार्थ्यांकडून हयात दाखल्यासोबत उत्पन्न प्रमाणपत्र दाखला दिनांक ३० जून पर्यंत देणे बंधनकारक करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, वयोवृद्ध व निराधार दिव्यांग योजना यामध्ये लाभ घेणारे सर्व लाभार्थी हे शारीरिक दृष्ट्या सक्षम नसल्याने उत्पन्न दाखला मिळवण्यासाठी त्यांना शारीरिक, आर्थिक व मानसिक त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी लाभार्थ्यांनी उत्पन्न प्रमाणपत्र न दिल्यास त्यांचे अनुदान बंद होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच याप्रकरणी लाभार्थ्याकडून केवळ स्वयंघोषणापत्राद्वारे हयात व उत्पन्न दाखला घेतल्यास वयोवृद्ध, निराधार आणि दिव्यांग नागरिकांची गैरसोय होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर योजनेत लाभार्थ्यांकडून उत्पन्न प्रमाणपत्र न घेण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सक्षम अधिका-याने दिलेल्या उत्पन्नाचा दाखला विचारात घेऊन व्यक्तींना योजनेचा लाभ देण्यात येतो.

---

### लांजा (जि.रत्नागिरी) शहरातील नळपाणी पुरवठा योजनेची नवीन पाईपलाईन टाकण्याबाबत

**(८) ५८४६७ (०९-०५-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लांजा (जि.रत्नागिरी) शहरातील महामार्गावरील उड्डाणपूलाच्या कामामुळे शहराची नळपाणी पुरवठा योजनेची पाईपलाईन वारंवार नादुरुस्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाईपलाईनमुळे उड्डाणपूलाचे व महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सन २०१८ पासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाईपलाईन सन १९७२ च्या दरम्यान स्थापित करण्यात आली असून, जुनी व जीर्ण झालेली पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक व व्यापारी संघटनांकडून वारंवार प्रशासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन नवीन पाईपलाईन टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) लांजा नगरपंचायत कार्यक्षेत्रातून राष्ट्रीय महामार्ग जात असून सदर महामार्गाच्या दुतर्फा तत्कालिन ग्रुप ग्रामपंचायत यांचेकडून सन १९७८ मध्ये पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्यात आली होती. सद्यस्थितीत राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून करण्यात येत असून सदरचे काम करतांना पाईपलाईन वारंवार नादुरुस्त व लिकेज होत आहे, ही वस्तूस्थिती आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) लांजा नगरपंचायत क्षेत्रातील नागरीकांसाठी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे बाधित होत असून भूसंपादन झाल्यानंतर सदरची पाईपलाईन स्थलांतरीत करणार असल्याचे चौपदरीकरणासाठी नियुक्त केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणेने कळविले आहे. त्यानुसार नगरपंचायत क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन स्थलांतरीत करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश संबंधितांना देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मेट्रो-६ मार्गिका स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी (EEH) कॉरीडॉर येथील उड्डाणपूलाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेबाबत

**(९) ५८६१६ (२४-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो-६ मार्गिका स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी (EEH) कॉरीडॉरची सुधारणा करण्याकरिता लिंकरोड ते पूनमनगर पर्यंत प्रस्तावित उड्डाणपूल मेट्रो लाईन-६ (overlapping) कामाच्या निविदा प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे स्वत:चे उड्डाणपूल बांधकाम करण्यासाठी स्वतंत्र विभाग असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रकल्प हाती घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने परस्पर एका प्राधिकरणाची नियुक्ती करुन अंदाजे ५.०७ कि.मी. अंतराच्या (overlapping) पुलाचे काम त्यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ५० टक्के आगाऊ रक्कम रु.३८४.५० कोटी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यामुळे दर महिन्याला महानगरपालिकेस अडीच कोटी रूपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) वर्सोवा, मुंबई येथील जोगेश्वरी-विक्रोळी लिंक मार्गावर जोगेश्वरी रेल्वे मार्गावरुन जाण्याकरीता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुर्ण करुन सप्टेंबर, २०१५ मध्ये वाहतूकीस खुला करण्यात आला आहे. याच मार्गालगत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो ६ (स्वामी समर्थ नगर - विक्रोळी) या मार्गाचे नियोजन करण्यात आले. मेट्रो मार्ग क्र ६ च्या रेखाकनांमध्ये अस्तित्वात असलेला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मार्गालगत येत असल्याने सदरहू उड्डाणपुल व मेट्रो प्रकल्प यामध्ये एकसुत्रीकरण राहण्यासाठी उड्डाणपुलाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे इन्फिनिटी मॉल ते महाकाली केव्हज या ५.०७ कि.मी हा मार्गापैकी २.५८ कि.मी. लांबीचा मार्ग दुमजली उड्डाणपुलाने (वरती मेट्रो, खाली उड्डाणपुल व त्या खाली रस्ता ) जोडण्याचा निर्णय घेतला. सद्यस्थितीत इन्फिनिटी मॉल ते मिल्लत स्कुल व महाकाली केव्हज ते पश्चिम द्रुतगती मार्ग पर्यंत दुमजली उड्डाणपुलाचे काम सुरु असून ५५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्राधिकरणामार्फत मेट्रो मार्ग क्र.६ वर सुरु असलेल्या दुमजली उड्डाणपुलास अस्तित्वात असलेल्या हिदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलाला पश्चिमेस मिल्लत स्कुल जवळ व पुर्व दिशेस पश्चिम द्रुतगती मार्गावरुन जेव्हीएलआर कडे जाणारा मार्ग केबल स्टेड (cable stayed) प्रकारच्या उड्डाणपुलाने जोडण्याचे नियोजित आहे. सदरहू कामासाठी रु ३८४.५० कोटी निधी बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्राधिकरणाकडे वर्ग केलेला आहे. सदरहू काम सुरु करण्यासाठी निविदा प्रक्रियेची कार्यवाही प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत काम सुरु असलेल्या मेट्रो मार्ग क्र ६ व दुमजली उड्डाणपुलाच्या जोडणी कामामुळे या भागात काही प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. सदरहू वाहतूक कोंडीवर आवश्यक त्या उपाययोजना प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

---

## मुंबईसह महाराष्ट्रात खाजगी प्रवासी आराम बस सेवेची अवैध वाहतूक सुरु असण्याबाबत

**(१०) ५८७५८ (२१-०४-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महाराष्ट्रात खाजगी प्रवासी आराम बस सेवा मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बस सेवेत क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक केली जात असून या बस विना परवाना असून त्यात अग्निशमन यंत्रणा नसलेल्या बसेसची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने खाजगी कंत्राटी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसचे भाडेदर निश्चित करूनही प्रवाशांकडून जादा दर आकारीत प्रवाशांची लुट करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०५-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यात खाजगी प्रवासी बसेसव्दारे प्रवासी वाहतूक करण्यात येते.

शासनाने विहित केलेल्या भाडेदरापेक्षा जास्त भाडेदर आकारल्यास खाजगी कंत्राटी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसवर मोटार वाहन अधिनियमानुसार कारवाई करण्यात येते.
(४) राज्यातील क्षेत्रीय कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत खाजगी कंत्राटी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| कालावधी | दोषी वाहने | दंड वसुली (रु. लाखात) |
|---|---|---|
| एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ | २०,१७९ | १९२५.८० |
| एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ | २५,७८५ | २८३९.०५ |

तसेच दि. ०९.१०.२०२२ ते २३.१०.२०२२ या कालावधीत विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येऊन ३८८५ गुन्ह्यांसाठी रु. ९९.०६ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आला तसेच सणांच्या कालावधीत ४९८ बसेस वर ज्यादा भाडे आकारण्याबाबत कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्याचा मुंबई विकास प्राधिकरणात समावेश करण्याबाबत

**(११) ५८७९० (२४-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुका हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील मुंबई- नाशिक दरम्यान असलेले मध्यवर्ती ठिकाण असून आदिवासी व दुर्गम तालुक्याबरोबर मुंबई सारख्या महानगराला सर्वाधिक पाणी पुरवठा करणारा तालुका असल्याने त्यांचा मुंबई विकास प्राधिकरणात समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शहापूर तालुका (जि.ठाणे) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकक्षेमध्ये समाविष्ट करणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे स्तरावरुन जिल्हाधिकारी ठाणे, जिल्हाधिकारी पालघर, मुख्य कार्यकारी

अधिकारी, जि.प. ठाणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर या स्थानिक प्रशासनाकडून त्यांचा अहवाल सादर करणेबाबत दि.०२.०५.२०२२ रोजी कळविण्यात आले आहे. सदरहू अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

**वाडा नगरपंचायत (जि.ठाणे) मध्ये सफाई कामगार म्हणून गत दोन वर्षापासून कार्यरत कामगारांना कामावरुन काढल्याबाबत**

**(१२) ५८७९२ (२१-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा नगरपंचायत मध्ये (जि.ठाणे) सफाई कामगार म्हणून गत दोन वर्षापासून कार्यरत असलेल्या १२ कामगारांना दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी कामावरुन काढण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांना एकाएकी काढून टाकण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) वाडा नगरपंचायत हद्दीतील घनकचरा संकलन, वाहतुक, रस्ते, गटारे सफाई कामासाठी मनुष्यबळ पुरवठा करणे या कामासाठी मे.मेनदीप इंटरप्रायजेस यांना कंत्राट देण्यात आले होते. सदरचे कर्मचारी हे कंत्राटदारामार्फत वाडा नगरपंचायत मध्ये कंत्राटी पध्दतीने काम करत होते. नगरपंचायत तर्फे सदरच्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढण्यात आलेले नाही. निधी अभावी सदरचे कंत्राट थांबविण्यात आले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव महानगरपालिकेचे तत्कालीन प्र.नगररचना सहाय्यक यांनी बेकायदेशीर अभिन्यास परवानगी दिल्याबाबत**

**(१३) ५८८४८ (२८-०४-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिकेचे तत्कालीन प्रभारी सहायक संचालक, नगररचना श्री.चंद्रकांत निकम यांनी बेकायदेशीर अभिन्यास परवानगी दिल्याच्या प्रकरणात शासन ज्ञापन क्र. तक्रार-६३२१/३०/प्र.क्र.०३/नवि-२७, दिनांक १८ एप्रिल, २०२२ अन्वये नगर विकास विभागाने दोषारोप पत्र बजाविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन प्रभारी सहायक संचालक, नगररचना श्री.चंद्रकांत निकम यांनी ४ बेकायदेशीर अभिन्यास मंजूर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१९ च्या पत्रात श्री.निकम यांची विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत मत नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन ज्ञापन क्र.तक्रार-६३२१/३०/प्र.क्र.०३/नवि-२७, दिनांक १८ एप्रिल, २०२२ नुसार तत्कालीन प्रभारी सहायक संचालक, नगररचना श्री.चंद्रकांत निकम यांच्या विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) होय.

(२), (३) व (४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा दि.२२/१२/२०२० च्या पत्रान्वये पाठविलेला अहवाल विचारात घेता, श्री.चंद्रकांत रंगनाथ निकम, तत्कालीन प्रभारी सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शहर महानगरपालिका या पदावर कार्यरत असताना त्यांनी केलेल्या अनियमिततेबाबत त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे कलम ८ खाली दि.१८/०४/२०२२ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावून शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे. तसेच, त्यांच्याविरुद्ध तयार करण्यात आलेल्या आरोपाची चौकशी करण्याकरिता दि.१६/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी व सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा, जळगाव यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, सदर चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मेक्सिकॅब सारख्या वाहनांना परवाना देण्याबाबत**

**(१४) ५९३२८ (२५-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅक्सी कॅब सारख्या वाहनांना परवाना देण्याकरिता पाच सदस्यीय समितीची फेरस्थापना केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीचा अहवाल सादर करून याबाबत शासन धोरण निश्चित करणार असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२३) :** (१) होय.

मॅक्सी कॅब वाहनांचा आढावा घेण्यासाठी दि.०५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मॅक्सी कॅब वाहनांना परवाने देण्याबाबत समिती गठीत करण्यात आली होती. दि.१९.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर समितीचे खालीलप्रमाणे पुनर्गठण करण्यात आले आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमानाथ झा (सेवानिवृत्त भा.प्र.से.) | अध्यक्ष |
| २ | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३ | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ | सदस्य |
| ४ | अपर परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ५ | परिवहन उपायुक्त (अंमल-२) महाराष्ट्र राज्य, मुंबई सदस्य | सचिव |

(२) व (३) सदर समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विविध रेल्वे स्टेशन, एस.टी.स्थानकाच्या परिसरात टॅक्सीचालक जवळचे भाडे नाकारत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(१५) ५९३७५ (२२-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर व बाहेरून कामानिमित्त तसेच गावाकडून व पर्यटन करून येणाऱ्या नागरीकांना विविध रेल्वे स्टेशन व एस.टी.स्थानकाच्या परिसरात टॅक्सीचालक सर्रास जवळचे भाडे नाकारत असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भाडे नाकारण्याच्या घटना दिवसेदिवस वाढत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असून शासनाने भाडे नाकारणाऱ्या टॅक्सीचालाकावर कोणती दंडात्मक कारवाई करणार आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०५-२०२३) :** (१) दिनांक २०.०१.२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे भाडे नाकारणाऱ्या टॅक्सी/रिक्षा चालकांविरुद्ध मोटार वाहन कायदा तसेच मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाच्या निर्णयानुसार दंडात्मक व अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) मुंबई व मुंबई उपनगरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२३ या कालावधीत भाडे नाकारणाऱ्या ऑटोरिक्षा व टॅक्सी चालकांविरुध्द १२०९ तक्रारी प्राप्त झाल्या असून एकूण रु. ९.२१ लक्ष दंड वसुल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दिव्यांग बांधवाना महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत सन २०१८ पासून लाभ मिळालेला नसल्याबाबत

**(१६) ५९३८३ (२१-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकाही दिव्यांग व्यक्तीना निरंतर सेवेच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत दिव्यांग बांधवाना सन २०१८ पासून लाभ मिळालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने दिव्यांग व्यक्तीच्या विकासासाठी असलेल्या योजना प्रभावीपणे राबविण्यास टाळाटाळ करणाऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटी होते. त्यापैकी ४७.५२ कोटी महामंडळाला वितरीत करण्यात आले आहे.

सन २०१८-१९ पासून भागभांडवलासाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली असली तरी, भागभांडवल मर्यादेमुळे निधी वितरीत करण्यात आला नाही. परिणामी सिंधुदुर्ग जिल्हा तसेच राज्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना महामंडळाकडून थेट कर्ज

योजनेतंर्गत कर्ज वितरीत करण्यात आले नाही.

तसेच राष्ट्रीय दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत दिव्यांग स्वावलंबन योजनेतंर्गत शैक्षणिक कर्ज व स्वयंरोजगारासाठी प्राप्त होणारा निधी यापूर्वी दिलेल्या कर्जाची वसूली अत्यल्प असल्याने राष्ट्रीय महामंडळाने सन २०१७-१८ पासून उपलब्ध करुन दिलेला नाही.

शासन निर्णय दिनांक ०८ जून, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटीवरुन रुपये ५०० कोटी करण्यात आली असून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता महामंडळाच्या भागभांडवलासाठी रुपये ७ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. तसेच सन २०२२ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात रुपये ५० कोटी उपलब्ध करुन राष्ट्रीय महामंडळाची प्रलंबित वसूली अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अद्यापपर्यंत सिंधुदुर्ग जिल्ह्यातून महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाकडे एकूण ३४५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २४५ कर्ज प्रकरणे विविध व्यवसायासाठी मंजूर करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग नगरीला नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(१७) ५९३९४ (११-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा मुख्यालय निमिर्ती होऊन ३० वर्षे उलटल्यानंतर देखील अद्यापपर्यंत सिंधुदुर्गनगरी नगरपंचायत होऊ शकलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सिंधुदुर्ग जिल्हा हा एकमेव जिल्हा आहे जेथे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपंचायत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सिंधुदुर्ग नगरीला नगरपंचायतीचा दर्जा देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात पायाभुत सुविधांची उभारणी करण्यासाठी, तसेच विकासाला गती देण्यासाठी ओरोस बुद्रुक, अणाव व रानबांबुळी या गावांचा समावेश करुन ओरोस (सिंधुदुर्गनगरी) येथे नगरपंचायत स्थापन करण्याच्या अनुषंगाने "प्रारुप अधिसूचना" दि.२५ जानेवारी, २०१६ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील ऑरेज गेट-पूर्व मुक्त मार्ग-नरिमन पॉईट या भुयारी पोहच मार्ग प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत

**(१८) ५९७०७ (२४-०४-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील ऑरेज गेट-पूर्व मुक्त मार्ग-नरिमन पॉईट या भुयारी पोहच मार्ग प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहत आरखडयानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भुयारी मार्ग बांधण्यासाठी दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निविदा मागविल्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाकरीता एकूण किती खर्च येणार आहे तसेच उक्त कामास सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदरहु प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत सुमारे रु. ८०५६ कोटी आहे. प्राधिकरणाच्या दि. १०.०३.२०२३ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीत प्राधिकरणाने मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीसाठी भुयारी मार्गाचे बांधकाम व अन्य तदनुषंगीक कामे करण्याकरिता रु. ८०५६ कोटीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता नोव्हेंबर २०२२ मध्ये मे. पॅडको कं. लि. या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटदाराच्या नेमणुकीकरिता दि. ३१ जानेवारी, २०२३ रोजी जागतिक स्तरावर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा प्रक्रियेअंती प्रकल्पाकरिता कंत्राटदाराची नेमणूक करणे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात मराठा समाजास शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याबाबत

**(१९) ५९७६५ (२४-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठा समाजास शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याकरिता राज्यभरातून ५८ मूक मोर्चे काढण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वेगवेगळया शासकीय विभागामध्ये ७५००० इतकी मेगा भरती तसेच दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे ८१६९ उमेदवारांची भरती इ. प्रक्रिया जाहीर करुन या दोन्ही भरती प्रक्रियेत मराठा समाजास आरक्षण जाहीर केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठा समाजास आधी आरक्षण दया मगच नोकर भरती करा या प्रमुख मागणीसाठी मराठा समाजाच्यावतीने दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन केले असून त्याबाबतची निवेदने मा.उपमुख्यमंत्री व मा.पोलीस आयुक्त, मुंबई यांना दिनांक २२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सादर केलेली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात तसेच नोकर भरतीमधील राखीव जागांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाचे आरक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले असल्यामुळे मराठा समाजास

सध्या सामाजिक आरक्षण उपलब्ध नाही. तथापि, मराठा समाजास आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे १०% आरक्षण उपलब्ध आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५.५.२०२१ च्या आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाचे आरक्षण रद्द केल्यामुळे राज्य शासनाने त्याविरोधात पुनर्विचार याचिका क्र.१४/२०२२ दाखल केली होती. सदर पुनर्विचार याचिका दि.११.४.२०२३ रोजी फेटाळण्यात आल्यामुळे त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल केली आहे. सदर उपचारात्मक याचिकेमध्ये तसेच, मराठा आरक्षण प्रकरणी उद्भवणाऱ्या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञांचा एक टास्क फोर्स स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने उपचारात्मक याचिका (Curative Petition) फेटाळल्यास मराठा समाजास आरक्षण देण्यासाठी त्या समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी एक समर्पित मागासवर्ग आयोगाचे गठन करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहरी विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) ५९८६० (११-०५-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी भागामध्ये जागोजागी उभारण्यात येणाऱ्या वाढत्या बेकायदा जाहिरात फलकांमुळे शहरांचे विद्रुपीकरण होत असल्याने शहरी विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यात दुरुस्ती करण्याची शिफारस मा.उच्च न्यायालयाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात उच्चस्तरीय आढावा समितीने केलेल्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही त्याप्रमाणे कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) उच्चस्तरीय आढावा समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शहर विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यात दुरूस्ती करण्याची कार्यवाही गृह विभागाकडून करण्यात येत आहे.

---

## माजलगाव (जि.बीड) शहरातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना व इतर गोरगरीब नागरीकांना कामगार करातून सुट मिळण्याबाबत व इतर अडचणीबाबत

**(२१) ६००२८ (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) शहरातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना व इतर गोरगरीब नागरीकांना कामगार करातून सुट मिळण्याबाबत व इतर अडचणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे,
अशा आशयाचे दि.२८ नोव्हेंबर, २०२२ रोजी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना प्राप्त झाले आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने माजलगाव नगरपरिषद विशेष सर्वसाधारण सभा ठराव क्र.३२, दि.२८ डिसेंबर, २०२० पारित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना व रमाई घरकुल योजनेतील नागरिकांना कामगार करातून सूट दिली जात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मालाड (पूर्व) पुष्पा पार्क परिसरातील संथगतीने सुरु असलेले पादचारी भूयारी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२२) ६००४२ (२२-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड (पूर्व) पुष्पा पार्क परिसरातील नागरीकांना मालाड रेल्वे स्थानकाकडे जाण्याकरिता मुंबई महानगर विकास प्रदेश प्राधिकरणातर्फे बांधकाम करण्यात येत असलेल्या पश्चिम द्रुतगती महामार्गाखाली असलेल्या पादचारी भूयारीमार्ग तसेच व्हेईक्युलर सबवे बनविण्याचे सुरु असलेले विकासकाम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भूयारी मार्गाचे विकास काम संथगतीने सुरु ठेवून वेळेत पूर्ण न करण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मालाड पूर्व परिसरातील नागरीकांची रेल्वे स्थानकाकडे येण्यासाठी होत असलेली गैरसोय दूर करण्याकरिता उक्त भूयारी मार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासन तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर मार्गावर मेट्रोची कामे प्रगतीपथावर असल्यामुळे तसेच कोव्हीड व ४.७५ लक्ष पी.सी.यु. असणारी वाहतुक वर्दळ या कारणामुळे प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु होते. पादचारी भुयारी मार्ग तसेच वाहन भुयारीमार्गाचे काम पूर्ण झाले आहे आणि सदर भुयारी मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.
(२) सदर मार्गावर मेट्रोची कामे प्रगतीपथावर असल्यामुळे तसेच कोव्हीडच्या प्रादुर्भावामुळे आणि वाहतुक वर्दळ ४.७५ लक्ष पी.सी.यु. असल्याने प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु होते.
(३) सद्यस्थितीत काम पूर्ण झाले आहे व भुयारी मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२३) ६०१४८ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पास सार्वजनिक खाजगी सहभागाने DBFOT तत्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अंमलबजावणी करण्यास शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाची उभारणी आयटी.सीटी.मेट्रो रेल लि., पुणे या सवलतकर कंपनीमार्फत करण्यात येणार असून प्रत्यक्ष बांधकाम दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ पासून सुरु झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील काम जलदगतीने पुर्ण होणेकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२३) :** (१) व (२) होय, खरे आहे.
(३) सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी प्राधिकरणामार्फत सवलतकार कंपनी पुणे आय.टी.सीटी. मेट्रो रेल लि. यांना दि. २५.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली आहे व तात्काळ प्रभावाने प्रत्यक्ष क्षेत्रीय स्थळी काम सुरु करण्यात आले आहे. आजमितीस प्रकल्पाचे भौतिक काम ३३% पूर्ण झाले आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सवलतकार, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे वाहतूक शाखा व इतर संबंधित सर्व यंत्रणाबरोबर समन्वय करुन विहित वेळेत म्हणजेच माहे मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करून मेट्रो प्रकल्प कार्यान्वित करणेचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेपासून अनुसूचीत जाती व नवबौध्द प्रवर्गातील शेतमजूर वंचित असल्याबाबत

**(२४) ६०३५० (२६-०४-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरीता दारिद्रय रेषेखालील भूमीहीन शेतमजूरांना सन २००४-२००५ पासून ५० टक्के अनुदानावर व सन २०१८ पासून १०० टक्के अनुदानावर चार एकर कोरडवाहू व दोन एकर बागायती जमीन समाजकल्याण विभागाकडून उपलब्ध करुन दिली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त योजनेचे राज्यात लाखोच्या संख्येत लाभार्थी असून सुध्दा मागील १७ वर्षात फक्त ५९०० लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असून या योजनेकरीता निधी उपलब्ध असून सुध्दा समाजकल्याण विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे लाखो लाभार्थी या योजनेपासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील भूमीहीन शेतमजूरांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यात विकासकामासाठी शासनाने दिलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२५) ६०५०९ (२६-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातर्फे अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांत विकासकामे करण्यासाठी सन २०२२-२०२३ साठी शासनाकडून २५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक वर्ष संपत आले असतानाही दलित वस्त्यांतील प्रस्तावित कामांचा आराखडा तयार केलेला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार सदरील विकासकामाना मिळणारा निधी अखर्चित राहिला असल्याने विकासकामांत दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे, तथापि या योजनेसाठी सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यास फेब्रुवारी, २०२३ मध्ये मंजूरी प्रदान करण्यात आली असून सन २०२२-२३ मधील रु.३०.०० कोटीच्या ६३७ विकास कामांना मंजूरी प्रदान करण्यात येऊन निधी उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेतील प्रभारी महापालिका सचिव या पदावर नियमबाहय नियुक्ती केल्याबाबत**

**(२६) ६०५६२ (११-०५-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण–डोंबिवली महानगरपालिके मधील श्री.संजय जाधव यांची प्रभारी महानगरपालिका सचिव या पदावर नियमबाहय नियुक्ती केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेअंतर्गत प्रशासकिय सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी तांत्रिक व लेखा सेवेतील पदांवर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांची प्रशासकिय सेवेतील पदावर नियुक्ती करता येणार नाही अशी दि ०१/०६/२०२१ च्या शासन निर्णयात स्पष्ट तरतुद नमुद असतांना देखील श्री.जाधव यांची प्रभारी महापालिका सचिव या पदावर नियमबाहय नियुक्त करण्यात आली आहे, हे ही आहे काय,
(३) असल्यास, श्री.जाधव यांची प्रभारी पदांचा कार्यभार किती कालावधीकरिता व कधीपासून देण्यात आला आहे,
(४) असल्यास, श्री.जाधव यांना देण्यात आलेल्या नियमबाहय पदाबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) सद्यस्थितीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासकीय संवर्गात श्रेणी-१, महापालिका सचिव पदासाठीची विहीत अर्हता धारण करणारा अन्य अधिकारी कार्यरत नाही.

श्री. संजय जाधव वगळता अन्य संवर्गातील दुसऱ्या कोणत्याही श्रेणी-१ मधील अधिकाऱ्याने विधी शाखेची पदवी धारण केलेली नाही.

प्रशासकीय सोय व कामकाजाची निकड विचारात घेऊन, श्री. जाधव यांच्याकडे दि.३०.११.२०१६ पासून प्रभारी महापालिका सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील व्यवस्था होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आलेला आहे.

सचिव पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर श्री. जाधव यांचेकडील अतिरिक्त कार्यभार संपुष्टात आणण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर रनवे बनविण्याबाबत

**(२७) ६०५७८ (२५-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ १३ वर्षापूर्वी मिहान इंडिया लि. ला हस्तांतरीत झाले असताना येथे अद्याप ४ हजार बाय ६० मीटरचा दुसरा रनवे बनविण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नागपूरसह विदर्भ विकासाला अडथळा येत असून माहे डिसेंबर २०२२ मध्ये शासनाने येथे मिहानसाठी नवीन विमानतळाची गरज असल्याचे जाहीर करुन २ महिन्यांत निविदा प्रक्रिया राबविण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२३) :** (१) (२) व (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ नागपूर चा ताबा मिहान इंडिया लि. ला माहे ऑगस्ट, २००९ ला प्राप्त झाला. असून नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे श्रेणीवाढ व आधुनिकीकरण करण्याकरिता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर सार्वजनिक खाजगी भागीदारा मार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये ४ हजार बाय ६० मीटरचा दुसऱ्या धावपट्टीचे बांधकाम समाविष्ट आहे. तथापि, नागपूर विमानतळाचे खाजगीकरण करण्याच्या उद्देशाने काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द केल्याने त्या विरूध्द जी.एम. आर. एअरपोर्ट लि. यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १७२३/ २०२० यामध्ये दिनांक १८/०८/२०२१ ला आदेश पारीत झाला असून, सदर आदेशाविरुध्द (१) नागरी विमान वाहतुक मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली (२) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली (३) महाराष्ट्र शासन, मुंबई (४) मिहान इंडिया लि. नागपूर यांनी प्रत्येकी स्वतंत्ररित्या विशेष याचिका (SLP) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केले आहे. या सर्वोच्च न्यायालयातील न्यायप्रविष्ठ प्रकरणात दिनांक ०९/०५/२०२२ रोजी निर्णय झालेला असून, सर्वोच्च न्यायालयातील विशेष याचिका क्रमांक १५५५६/२०२१ फेटाळण्यात आलेली आहे. यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्याबाबत केंद्र शासनाकडील निर्देश अद्याप अप्राप्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगांव जिल्हयातील रावेर नगरपरिषदेच्या मालमत्ता करासंदर्भात

**(२८) ६०६०७ (११-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) नगरपरिषदेच्या मालमत्ता करासंदर्भात शहरातील नागरिकांना नोटीस न मिळाल्याने सुमारे १०० च्या जवळपास नागरिकांनी तक्रारी केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित नगरपरिषदेच्या व मालमत्ता मोजमाप करणाऱ्या कंपनीच्या दिरंगाई विरोधात यापूर्वीच तक्रारी केल्या असुन पुन्हा एक दिवस नोटीस न मिळालेल्या तक्रारदारांची सुनावणी घेण्यासंदर्भात विनंतीही करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२२ रोजी सुनावण्या घेतल्या नंतर किमान २५ ते ३० नागरिक सुनावणीपासून वंचित असल्यामुळे या दिरंगाईस संबंधित नगरपरिषद तसेच मालमत्ता मोजमाप करणारी कंपनी जबाबदार असुन याचा नाहक त्रास रावेर शहरातील नागरिकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी ६३ नागरीकांचे स्वतंत्र अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जांवर सुनावणी न झाल्याने, ८४ नागरिकांच्या स्वाक्षरीचा तक्रार अर्ज रावेर नगरपरिषद कार्यालयात प्राप्त झाला. सदर अर्जावर स्वाक्षरी करणाऱ्यांपैकी २१ नागरीकांनी हरकत अर्ज दाखल केलेले नाहीत.

(२) हे खरे आहे,

सदर प्रकरणी प्राप्त ६३ अर्जांपैकी ४१ नागरिकांच्या हरकतींवर यापुर्वीच सुनावणी घेण्यात आली असून, उर्वरित २२ नागरिकांच्या तक्रार अर्जावर दि.२९ डिसेंबर, २०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

(३) हे खरे नाही,

तथापि, रावेर नगरपरिषदेच्या मालमत्ता करासंदर्भात वृत्तपत्रातील जाहिर सूचना व दवंडी या माध्यमातून नागरिकांना सुनावणीच्या वेळापत्रकाबाबत रावेर नगरपरिषदेमार्फत माहिती देण्यात आली होती.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला जमा करण्याची अट रद्द करण्याबाबत**

**(२९) ६०६८४ (२६-०४-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडील शासन निर्णय क्र. विसयो-२०१८/ प्र.क्र.६२/ विसयो दि. २०/०८/२०१९ मधील परिशिष्ट-६ (६)(क) नुसार संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यावर एप्रिल, जून महिन्यात उत्पन्नाच्या दाखला जमा करण्याची शासनाने सक्ती केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच या कालावधीत लाभार्थ्यांनी उत्पन्नाच्या दाखला जमा न केल्यास जुलैपासून अर्थसहाय्य बंद करण्याच्या सूचना परिपत्रकात देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जाचक अटीमुळे ग्रामीण भागातील अनेक लाभार्थींना या योजनेचा लाभ घेता येणार नसल्याने आर्थिक सहाय्य मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चाळीसगाव तालुक्यात एकूण ३१,२०० लाभार्थ्यांहून अधिक लोकं विविध योजनांचा लाभ घेत असून त्यापैकी संजय गांधी निराधारचे ५५००, श्रावणबाळ सेवा योजनेचे ८७०० व इंदिरा गांधी निराधार योजनेचे १७,००० लाभार्थी आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांकरिता शासन निर्णयातील अटी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) चाळीसगाव तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे ८१२१, श्रावणबाळ योजनेचे २४६३६, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ/विधवा/दिव्यांग योजनेचे १७४९६ इतके लाभार्थी आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेतील नोकर भरती व आकृतीबंधाबाबत

**(३०) ६०७१९ (२४-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने सुमारे ५ हजार ४४ इतक्या पदांबाबतचा आकृतीबंध तयार करुन नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आकृतीबंधातील तब्बल ४६५ पदे रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून यात माहुत, गाडीवान, लंबेकरी, यांच्यासह इतर काही कालबाह्य पदाचा समावेश आहे. तसेच मोठया प्रमाणात शिपाई पदे रद्द केली जाणार असून नव्याने ४०० पदांची निर्मिती केली जाणार असून यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर, सिस्टिम मॅनेजर, वैद्यकीय अधिकारी यांच्यासह इतर पदांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या प्रारुप आकृतीबंधानुसार सुमारे ४२७ पदांसाठी कोल्हापूर महानगरपालिकेस ८ कोटी इतक्या वेतनाकरीताचा अतिरीक्त बोजा वाढणार असल्याने शासन विशेष निधी मंजूर करण्याकरीता तसेच कोल्हापूर येथील आकृतीबंधास अंतिम मान्यता देऊन भरतीप्रक्रिया राबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कोल्हापूर महानगरपालिकेने सादर केलेल्या पदांच्या आकृतीबंधाची तपासणी करण्यात येत आहे. तसेच सन २०२३ च्या पदभरतीकरीता केवळ एक वेळची बाब म्हणून आस्थापना खर्चाच्या ३५% मर्यादेची अट शिथील करुन अत्यावश्यक/ अत्यंत गरजेची पदे भरण्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावाबाबत

**(३१) ६०७२० (११-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर नगरपालिकेचे सन १९७२ मध्ये महानगरपालिकेत रुपांतर झाले असुन तब्बल ५० वर्षापासून कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न शासनस्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेची हद्द सुमारे ६६.८२ चौ.किमी. असून, या अल्प जागेत सुमारे ७ लाख नागरीक वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिका यांची हद्दवाढ झाली नसल्यामुळे राज्य व केंद्र सरकारच्या योजनेतुन निधी मिळविण्यास अडचणींचा सामना करावा लागतो तसेच नवीन उद्योग येण्याचे कोणतेही मार्ग दिसत नसल्याने उद्योजकांना प्राथमिक सोयीसुविधा मिळत नसल्याने सदर उद्योग बाहेर जाण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सतत मागणी केली असतांनाही शासनाने अद्यापही कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावास मान्यता न देण्याची प्रमुख कारणे कोणती आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) कोल्हापुर महानगरपालिकेने लगतच्या ४२ गावांचा समावेश करुन हद्दवाढीचा प्रस्ताव प्रथमत: सन १९९० मध्ये सादर केला होता.सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने हद्दवाढीबाबतची प्राथमिक

उदघोषणा दि.२०/०४/१९९२ रोजी निर्गमित करण्यात आली होती. परंतू सदर प्रस्तावित हद्दवाढीस त्यामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व गावांनी, तसेच लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविल्यामुळे हद्दवाढीचा निर्णय घेण्यात आलेला नव्हता. तथापि तदनंतर शहर हद्दवाढीबाबत विविध संघटनेमार्फत प्राप्त झालेली निवेदने, यापूर्वी सन १९९२ मध्ये निर्गमित केलेल्या प्राथमिक उदघोषणेस जवळपास २० वर्षाचा झालेला कालावधी तसेच हद्दवाढीत समाविष्ट होणाऱ्या गावांच्या लोकसंख्येत, उत्पन्नात, भौगोलिक परिस्थितीमध्ये झालेला बदल विचारात घेऊन महानगरपालिकेस सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करुन दि.१७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे यापूर्वीची प्राथमिक उद्घोषणा विखंडीत करण्यात आली होती. तद्नंतर कोल्हापूर महानगरपालिकेने शहरालगतच्या एक किलोमीटर परिसरातील १८ गावांचा व २ एम.आय. डी.सी. यांचे क्षेत्रांचा समावेश असलेला हद्दवाढीचा नवीन प्रस्ताव दि.१२/०६/२०१५ रोजी सादर केला असता, त्यावर हद्दवाढ विरोधी समिती व हद्दवाढ कृती समिती यांच्या समवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि.१६/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे.

(२) कोल्हापूर महानगरपालिकेचे एकूण क्षेत्र ६६.८२ चौ.कि.मी असून सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५,४९,२३६ इतकी आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०२१ मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेकडून हद्दवाढीबाबतच्या नवीन प्रस्ताव प्राप्त झाला. तथापि कोल्हापूर महानगरपालिका सभागृहाची मुदत दि.१५/११/२०२० रोजी संपुष्टात आली असून मा.राज्य निवडणूक आयोगाने कोल्हापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक, २०२० करीता प्रभाग रचना करण्याबाबतचे सुधारीत आदेश दि.०३/०१/२०२० रोजी निर्गमित केले असून त्यानुसार "स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या ६ महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाहीत" असे निर्देश प्राप्त आहेत.

---

**वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील मंजूर कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत**

**(३२) ६०९८९ (२६-०४-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड व मोर्शी (जि.अमरावती)हे दोन्ही तालुके सन २००४ पासुन अतिशोषीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुके अतिशोषित प्रकारातून मुक्त करण्यासाठी जमिनीमध्ये पाणी झिरपण्यासाठी कोप, सिमेंट नाला बांध (व्दारयुक्त- बिनाव्दारयुक्त), या शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या कामांना स्थगिती देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुक्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री पेयजल वा अन्य कोणतीही योजना सदर तालुक्यात कार्यान्वित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर कामावर असलेली स्थगिती उठवून अतिशोषित मोर्शी व वरुड तालुक्यात पाण्याची पातळी वाढविण्याकरिता उपाययोजना करणे आवश्यक आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुंषगाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

(३) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, अमरावती यांचे दिनांक- ०३.०३.२०२३ पत्रान्वये मोर्शी तालुक्यातील मुळ ७० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुर्नजिवीत करण्याकरीता शासन निर्णय क्र.मु.पोया- २०१९/ प्र.क्र.४८/पापु १९ दि. ०८.०७.२०१९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. सदर शासन निर्णयामधील अटी व शर्ती प्रमाण ग्रामपंचायतीकडून विहीत नमुन्यात ठराव घेवुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याचे नमुद होते, पंचायत समिती स्तरावर पाठपुरावाकरता केवळ २६ गावांनी योजना पुर्नजिवित करणेबाबत ठराव न दिल्यामुळे सदर योजना पुर्नजिवित करणे शक्य झाले नाही.

मुळ ७० गावे प्रा. पा पु. योजना मधील जवळजवळ प्रत्येक गावाने जिल्हा परिषद मार्फत स्वतंत्र योजना राबविलेली आहे. जल जीवन मिशन अंतर्गत मोर्शी व वरुड तालुका करीता पंढरी ३५ गावे प्रादे. पा.पु. योजना जामगाव व ५ गावे प्रा.पा.पु. योजना व वारवड २३ गांव प्रादे.पा.पु. योजना राबविण्याचे नियोजित आहे. यापैकी पंढरी प्रकल्पावरून ३५ गावे प्रा. पा.पु. योजना व पाक प्रकल्पावरुन जामगांव व ५ गावे प्रा.पा. पु. योजनांची कामे नुकतीच सुरु करण्यात आलेली आहेत. चारघड प्रकल्पावरुन २३ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेबाबत चारघड धरणातील एकुण पाणी आरक्षण २०.८२टक्के होत असल्याने लोकप्रतिनिधी स्तरावर चर्चा सुरु असुन सदर योजनेची कामे अद्याप सुरू करण्यात आलेली नाहीत. पुसला गावाकरीता FD work मध्ये WTP जुन्या ESR ला जोडण्याकरीता पाइपलाईन टाकून देण्यात आली आहे.

तसेच जलस्वराज्य टप्पा-२ मध्ये जरूड गावाकरीता स्वतंत्र योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

रिध्दपुर करीता मुख्यमंत्री पेयजलमध्ये प्रस्तावित करून नंतर जल जीवन मिशन अंतर्गत स्वतंत्र योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. खोपडा पुर्नवसन करीता स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्यात आलेली आहे

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन निर्णय क्र. मजम २०२२/ प्र.क्र. १४३ / जल-३, दि. ०८ जुलै २०२२, नुसार सदर कामांची निविदा रद्द करण्यात आली आहे. सदर कामांची स्थगिती उठविण्याबाबत कार्यवाही चालू आहे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिल्हा स्तरावरील निराधार समिती सदस्यांच्या अशासकीय नियुक्त्या प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ६१३४१ (२४-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा स्तरावरील निराधार समिती सदस्यांच्या अशासकीय नियुक्त्या प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरगरीब निराधार अपंग तसेच वयोवृद्ध विधवा महिलांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेकडो पात्र लाभार्थी अर्ज करूनही प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भात बैठकीचे आयोजन व नियोजन होत नसल्याने असंख्य प्रकरणे तहसील कार्यालयात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच निराधार समित्यांचे काम तहसीलदारा यांच्याकडे असल्यामुळे गोरगरीब निराधार वंचित घटकांना अनुदानासाठी तहसील कार्यालयात यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार निराधार समित्या गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यात पालकमंत्र्यांच्या शिफारशीनुसार ४० तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती स्थापन करण्यात आली आहे. विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयात संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठीत होईपर्यंतच्या कालावधीत संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली समितीव्दारे विशेष सहाय्य योजनेसाठी प्राप्त होणा-या अर्जांवर कार्यवाही करण्यात येऊन पात्र व्यक्तींना योजनेचा लाभ देण्यात येतो.

---

## भिवंडी (जि. ठाणे) महानगपालिका उपअभियंता यांनी निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे त्यांना निलंबित करण्याबाबत

**(३४) ६१३७५ (११-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगपालिका उपअभियंता, श्री.सचिन नाईक यांनी कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२ मध्ये काम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणतेही नियंत्रण न ठेवल्याने निकृष्ट दर्जाचे रस्ते व गटार बांधले गेल्याने त्याची दुरावस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आयुक्तांनी या उपअभियंत्याला निलंबित करून चौकशी करण्याची मागणी महापालिकेच्या इमारतीसमोर साखळी उपोषण सुरु करुन माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) भिवंडी महानगरपालिकेच्या आस्थापनवेरील उप अभियंता, श्री. सचिन नाईक यांच्या विरोधात रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याची तक्रार करुन स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेसमोर बेमुदत साखळी उपोषण करण्याचे निवेदन माहे जानेवारी, २०२३ मध्ये दिल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, सदरची तक्रार प्रगती पथावरील अपुर्ण कामाची असून उक्त काम पुर्ण करण्यात आले आहे. तसेच प्रस्तुत रस्त्याच्या कामाचे त्रयस्थ परिनिरीक्षण शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे यांच्यामार्फत करुन गुणवत्ता योग्य असल्याची खातरजमा केली असल्याचे व उक्त प्रकरणी चौकशी अथवा कारवाईची आवश्यकता नसल्याची बाब भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपुरी- त्र्यंबकेश्वर मतदार संघातील समृध्दी महामार्गामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(३५) ६१५१९ (२५-०४-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी- त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील समृध्दी महामार्गामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.आ.श्री.हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य यांनी दिनांक ३०.०७.२०२२ च्या पत्रान्वये सदर नुकसान भरपाई मिळण्याबाबत व दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड होण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे.

(२) तथापि, सन २०२२ मधील अतिवृष्टीमुळे बांधकाम पॅकेज क्रमांक १४ मधील समृध्दी महामार्गाच्या लिंक रोडचे बाजूच्या शेतीमध्ये पाणी साचल्यामुळे काही शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे.

सदर बाबतीत तहसिलदार इगतपूरी यांनी पंचनामा करुन बाधित जमिनीचे क्षेत्रफळ त्यांचे दिनांक ०२.१२.२०२२ च्या

पत्रान्वये कळविले आहे. सदर क्षेत्रफळानुसार द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम कळविण्याबाबत तहसिलदार इगतपूरी यांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या दिनांक २३.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविले होते. परंतू कृषी अधिकारी यांच्याकडून अद्याप अहवाल प्राप्त न झाल्यामूळे भूमिसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपूरी-त्र्यंबकेश्वर, उपविभाग, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १२.०५.२०२३ च्या पत्रान्वये तालुका कृषी अधिकारी यांना तसे पुन्हा कळविले आहे व म.रा.र.वि. महामंडळाकडून पाठपुरावा सुरु आहे. नुकसान भरपाईबाबत कृषी अधिकारी यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलेट ट्रेन व मुंबई-बडोदा महामार्ग रुंदीकरणासाठी वृक्ष तोडण्याचा निर्णय वसई-विरार महानगरपालिकेने घेतल्याबाबत**

**(३६) ६१५४३ (१२-०५-२०२३). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलेट ट्रेन व मुंबई-बडोदा महामार्ग रुंदीकरणासाठी ३ हजार २२९ वृक्ष तोडण्याचा निर्णय वसई-विरार महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढत्या तापमानाचा व बदलत्या वातावरणाचा धोका वाढत असतांना एवढया मोठया प्रमाणात झाडे तोडण्याचा निर्णय घेतल्यामुळे तेथील नागरीकांचा आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ३ हजार २२९ झाडे तोडल्यावर होणारी हानी भरुन काढण्यासाठी वृक्षतोडी आधीच इतरत्र पर्यायी जागेवर वृक्षारोपण करुन वृक्षतोड करावी अशी तेथील नागरीकांची होत असलेली मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) केंद्र शासनाच्या मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पामध्ये तसेच मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पामध्ये वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३०६६ झाडे बाधीत होत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे. तथापि, या दोन्ही प्रकल्पामध्ये बाधीत वृक्षांबाबतचा सविस्तर अहवाल महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण समिती यांच्याकडे महानगरपालिकेमार्फत मंजूरीकरिता सादर करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ (३) अन्वये करावयाच्या कार्यवाही अंतर्गत बहुतांश नागरिकांनी झाडांचे प्रत्यारोपण/नव्याने वृक्ष लागवड करण्याबाबत महानगरपालिका स्तरावर सूचना प्राप्त झाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी शासन परिपत्रक दिनांक १९.०१.२०२२ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महापालिका हद्दीत रस्ता रुंदीकरण व तत्सम कारवाईत बाधित झालेल्या गरीब गरजू दुकानदारांच्या गाळे वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(३७) ६१६७८ (११-०५-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत विविध कारणास्तव रस्ता रुंदीकरण व तत्सम कारवाईत बाधित झालेल्या गरीब गरजू दुकानदारांना गाळे न देता विभागाकडून परस्पर अन्य लाभार्थ्यांना गाळे दिले असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी

वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या विविध कामांमुळे बाधित झालेल्या विविध घटकांना त्याच्या मालकीचे गाळे अथवा घरे न देता इतरांना त्याचे वाटप केले जात असल्याने यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी बाधित झालेल्या विविध घटकांना त्याचे मालकीचे गाळे उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्र देऊन न्याय देणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बाधित झालेल्या विविध घटकांना त्याच्या मालकीचे गाळे अथवा घरे देण्याबाबत व दोषींवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार श्री.बापुसाहेब कारंडे यांच्या ठाणे महानगरपालिकेने निष्कासित केलेल्या वाणिज्य गाळयाच्या अनुषंगाने पुनर्वसन करण्याबाबतचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.
(२), (३) व (४) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रबोधनकार ठाकरे, व्यापारी संकुल, गावदेवी भाजी मार्केट येथील श्री.बापुसाहेब कारंडे यांचा वाणिज्य गाळा महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आला असून त्याच ठिकाणी सबंधितांची पुनर्वसन झाले नसल्याने श्री.युवराज बापुसाहेब कारंडे यांच्या मागणीनुसार गाळा देण्याची कार्यवाही करावी असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये ठाणे महानगरपालिकेस दिले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी श्री. युवराज बापुसाहेब कारंडे यांच्याकडून कागदपत्रे व इतर अनुषांगिक माहिती मागविण्यात आली असून सदर कागदपत्रांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे महानगरपलिका हद्दीतील रेल्वे स्टेशन परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने रिक्षावाले व फेरीवाले याच्यावर कारवाई करण्याबाबत

**(३८) ६१६९२ (११-०५-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपलिका हद्दीतील रेल्वे स्टेशन परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत असून अनधिकृत रिक्षावाले व फेरीवाले यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने समस्त ठाणेकर पादचाऱ्यांना त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृत रिक्षा ठिकठिकाणी थांबवून कोणतेही नियम न पाळता रस्त्यात अडथळे निर्माण करून पादचाऱ्यांसह अनेक उपक्रम करणारे जवळचे बेशिस्त, उद्धटपणा करणारे रिक्षाचालक यांचेवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त प्रकरणी महानगरपालिकेचे व वाहतूक शाखेचे संबंधित अधिकारी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने त्यांना निलंबित करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार ठाणे रेल्वे स्टेशन परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांवर नियमितपणे व सातत्याने कारवाई करण्यात येत असून सदरचे क्षेत्र फेरीवालामुक्त करण्यात आले आहे.

तसेच वाहतुक शाखा, ठाणे शहर यांच्यामार्फत ठाणे स्टेशन परिसरात रिक्षा चालक यांना शिस्त लावण्याच्या दृष्टिकोनातून स्वतंत्र पोलीस यंत्रणा ठेवण्यात आली असून अनधिकृत रिक्षा चालकांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते.

ठाणे महानगरपालिका स्तरावर स्टेशन परिसरातील फेरीवाल्यांना प्रतिबंधित करण्याकरिता मनुष्यबळाची विशेष पथके तयार करण्यात आली असून सदरचे क्षेत्र फेरीवालामुक्त करण्यात आले आहे. ठाणे रेल्वे स्टेशन परिसर वाहतुक कोंडी मुक्त व फेरीवालामुक्त करण्याकरिता वाहतुक शाखा, ठाणे यांच्याशी समन्वय करुन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोलेटी (ता.पेण,जि.रायगड) ग्रामपंचायतंर्गत निवाचे तलावातील गाळ काढून सुशोभित करण्याबाबत**

**(३९) ६१८९७ (२४-०४-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलेटी (ता.पेण,जि.रायगड) ग्रामपंचायतंर्गत निवाचे तलावात गाळ साचल्याने मासेमारी बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावातील गाळ काढल्यास पाण्याच्या साठयात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.एम.आर.डी.ए.चे माध्यमातून गाळ काढून तलाव संवर्धन व सुशोभित करणेकरीता दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यादरम्यान तत्कालिन सार्वजनिक मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्राम पंचायत कोलेटीने तलावातील गाळ काढण्याचे काम सुरु केलेले आहे. त्या अंतर्गत रक्कम रु. २,३८,३३६/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. मात्र सद्य:स्थितीत तलाव पूर्ण पाण्याने भरलेला असल्याने सदरचे काम पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर सुरु करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत चेतना शाळा ते नेवाळी नाका या मलंगगड रस्त्याचे काम अपूर्ण असताना देयके अदा केल्याबाबत**

**(४०) ६१९३२ (११-०५-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत चेतना शाळा ते नेवाळी नाका या मलंगगड रस्त्याचे काम अपूर्ण असताना ९८ टक्के देयके अदा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने सदरहू काम रेलकॉन या काळया यादीमध्ये टाकलेल्या कंपनीला दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार काळया यादीत असलेल्या ठेकेदार कंपनीला हे काम देणाऱ्या व काम पूर्ण न होताच ९८ टक्के देयके अदा करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

चेतना शाळा ते नेवाळी नाका या ४०५० मी. लांब व ३० मी. रूंद रस्त्याचे प्राकलन रक्कम रू. ४३.७६ कोटी इतकी आहे व निविदा रक्कम रू. ४१.७६ कोटी आहे.

सदर रस्त्याच्या लांबीमध्ये २७० मी. बंदिस्त नाल्याचे काम वाढल्यामुळे प्राकलनात १० टक्के वाढ होऊन, सुधारित प्राकलन रक्कम रू. ४५.८८ कोटी एवढी झाली आहे.

द्वारली भागातील नागरिकांच्या विरोधामुळे ४०५० मी. पैकी १८६ मी लांबीच्या रस्त्याचे काम अपूर्ण राहिलेले आहे.

कामाचा परिमाण वाढल्यामुळे झालेल्या कामाचे एकूण देयक रू. ४५.५९ कोटी होत आहे. यापैकी २ कोटी राखून ठेवलेले आहेत. तसेच, ठेकेदाराची रू. २.८९ कोटी सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेत जमा आहे.

रस्ते दुरूस्ती ठेकेदाराने न केल्यामुळे महानगरपालिकेने सुरक्षा रक्कमेतून रू.१.६१ कोटी दुरूस्तीच्या प्राकलनात तयार करून रस्ता दुरूस्ती अन्य ठेकेदाराकडून करून घेण्यात आलेली आहेत.

मलंग रोडच्या उर्वरित कामासाठी नवीन प्राकलन करण्याचे काम सुरू आहे.

(२), (३) व (४) मे. रेलकॉन या संस्थेबाबत निविदा प्रक्रियेवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे चौकशी केली असता, सदर कंपनीस रस्ते विभागातील कामांमध्ये अनियमितता आढळून आल्याने, त्यांच्याविरूध्द FIR नोंदविले आहेत. तसेच, त्यांना दि. १६.०५.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

मे. रेलकॉन इन्फा प्रोजेक्टस लि. या विभागात वर्ग १-अ मध्ये नोंदणीकृत आहेत. त्यांच्या नोंदणीबद्दल काळया यादीत टाकण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झाली नसल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दिव्यांग तसेच निराधारांना शासनाकडून दरमहा मिळत असलेल्या अनुदानात वाढ व उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविण्याबाबत**

**(४१) ६१९४१ (२५-०४-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनातर्फे समाजातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृतीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजना, योजनेमार्फत दरमहा केवळ १०००/- रुपये अनुदान देण्यात येत असून हे तुटपुंजे अनुदान वाढविणे तसेच, यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रामध्ये २१,०००/- रु. पेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला काढणे आवश्यक असून शहरी भागामध्ये गरजूना सदरचा दाखला मिळणे शक्य होत नाही यामुळे उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविण्याबाबत वांरवार शासनाकडे मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्या मागणीनुसार अनुदानात वाढ व उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिकेच्या ५०० चौ. फुटांपर्यतच्या मालमत्ता करात करमाफी देण्याबाबत

**(४२) ६१९४४ (२४-०४-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व नवीमुंबई येथील ५०० चौ. फुटांपर्यतच्या घरांना करमाफीच्या निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई व नवी मुंबईच्या धर्तीवर कल्याण-डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिकेमधील ५०० चौ.फुटांपर्यतच्या घरांना मालमत्ता करात करमाफी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने मालमत्ता करात करमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०६-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ५०० चौ. फुटांपर्यंतच्या घरांना करमाफीचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.
तथापि, नवी मुंबई महानगरपालिकेतील ५०० चौ. फुटांपर्यंतच्या घरांना करमाफीचा निर्णय शासनाने अद्याप घेतलेला नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मालमत्ता कर हा महानगरपालिकेचा मुख्य स्त्रोत आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कामकाज महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार पार पडते. सदर अधिनियमात घरांचा मालमत्ता कर माफ करण्याबाबत तरतूद नाही.
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात निवासी मिळकतींची संख्या सुमारे ५,०८,२३३ असून, त्यापैकी ५०० चौ. फुट व त्यापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींची संख्या ४,५८,४०७ इतकी आहे.
सदर मिळकतींना करमाफी झाल्यास, आर्थिकदृष्ट्या महानगरपालिकेच्या हिताचे नसल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऑनलाइन ॲग्रीगेटर्स बाईक टॅक्सी सेवेसंबंधी शासनाने धोरण आखणेबाबत

**(४३) ६१९६० (२५-०४-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओला व उबेर प्रमाणे ऑनलाइन टॅक्सी बाईक सेवा देणाऱ्या ॲग्रीगेटरर्सला द्यावयाच्या परवान्यांसंबंधी शासनाचे कुठलेही धोरण अस्तित्वात नसल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओला-उबेर च्या धर्तीवर रॅपिडोने बाईक सेवेला परवानगी मिळावी म्हणून पुणे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे केलेला अर्ज दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास फेटाळण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुंषगाने संघटनेच्या जोरावर चढे मीटर टॅक्सी दर व मनमानी दर आकारणाऱ्या प्रवासी वाहतुकीला स्वस्त सुलभ परवडणारा पर्याय देणाऱ्या ओला, उबेर, रॅपिडो व अन्य ॲग्रीगेटरर्स प्रवासी वाहतुकी संबंधी कर्नाटक व अन्य राज्याच्या धर्तीवर सुनिश्चित धोरण आखून परवाने जारी करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मे.रोपन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. (रॅपिडो) यांनी दिनांक ३०.११.२०२२ रोजी दुचाकी व तीनचाकी वाहनांसाठी ॲग्रीगेटर लायसन्स मिळविणेकरीता अर्ज सादर केला होता. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांचेकडून सदर अर्ज दिनांक २१.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत नामंजूर करण्यात आलेला आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.१५९९१/२०२२ च्या अनुषंगाने, राज्यात बाईक (दुचाकी) टॅक्सी वाहनांसाठी समुच्चयक धोरण तयार करण्यासाठी दिनांक १२.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

---

## पुणे शहराभोवतालच्या रिंग रोडचे काम भूसंपादन प्रक्रियेअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ६२३८७ (२५-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराभोवतालच्या चक्राकार वळण मार्गाच्या (रिंग रोड, पश्चिम) भूसंपादनासाठी राज्य शासनाकडून प्राप्त झालेला निधी भूसंपादना अभावी परत जाण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम हवेलीतील जमीन मालक आणि शेतकऱ्यांकडून प्रशासनाने पुन्हा जमिनीची कागदपत्रे आणि अर्ज मागविल्यामुळे भूसंपादन प्रक्रियेस विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पश्चिम भागातील रिंग रोडचे काम भूसंपादन प्रक्रियेअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळले, त्यानुंषगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०२३) :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाडा नगरपंचायत (जि.पालघर) कार्यालयामधील लेखापाल यांच्या बेजबाबदार व गैरवर्तणूकीबाबत

**(४५) ६२४८९ (११-०५-२०२३). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वाडा नगरपंचायत कार्यालयामध्ये लेखापाल हे कार्यरत असल्याचे व सदर अधिकारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचे मागील वर्षभरात वारंवार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या कामातील नेहमीचीच दिरंगाई लक्षांत घेता त्याबाबत विचारणा केली असता, "पालघर येथे जिल्हा कार्यालयात अथवा मंत्रालयात कामानिमित्त गेलो होतो" अशी उर्मटपणे सबब देऊन कार्यालयात उपस्थित न राहण्याचे बहाणे करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, आपली जबाबदारी कार्यालयीन शिस्तीनुसार पार पाडण्याऐवजी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांशी मनमानी पध्दतीने व असभ्य वर्तवणूक केल्यामुळे नागरिकांकडून त्यांचेबाबत सतत तक्रारी करण्यात येत असल्याचेही माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त लेखापाल यांची अरेरावीच्या वागण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अतिरिक्त मुख्य सचिव (नगरविकास विभाग) तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी पत्रान्वये वेळोवेळी तक्रार निवेदन देऊनही त्याबाबत अद्यापही कारवाई करण्यांत आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय

(५) असल्यास, सदर तक्रार व निवेदनाचे अनुषंगाने शासनाने चौकशी केली काय व त्यानुषंगाने संबंधित लेखापालांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) वाडा नगरपंचायत मध्ये कार्यरत असलेले लेखापाल यांचेविरुध्द माजी नगरसेविका वाडा नगरपंचायत, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे बेजबाबदार व गैरवर्तणूकीबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे तक्रार केली आहे, ही वस्तूस्थिती आहे.

(५) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधित लेखापाल यांचा खुलासा मागविण्यात आला असता त्यांनी सविस्तर खुलासा सादर केला आहे. संबंधित लेखापाल यांनी सादर केलेला खुलासा सकृतदर्शनी समाधानकारक वाटत असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे. तथापि, मा.सदस्यांनी याप्रकरणी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेता भविष्यात अशा पध्दतीने कार्यालयीन शिस्तीचा भंग होणार नाही, तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांना सौजन्याची वागणूक देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आल्या आहेत.

---

### पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिकेतील ठेका आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेमध्ये कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत

**(४६) ६२५३७ (२४-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधांनुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने दि. २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी नेमलेल्या एजन्सीमार्फत महानगरपालिका भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये सद्य:स्थितीत सुमारे ८०% ठेका आणि

कंत्राटी कर्मचारी असून सुमारे २०% इतकेच कायमस्वरुपी कर्मचारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या नवीन धोरणानुसार पालिकांमध्ये सरळ सेवा भरती झाल्यास यापुर्वी ५ ते १५ वर्षाहून अधिक काळ सातत्याने तसेच कोरोनासारख्या महामारीमध्येसूध्दा प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या ८०% ठेका आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांवर बेरोजगारी तसेच त्यांचे कुटूंबियांवर उपासमारीची वेळ येणार असल्याबाबत एका राजकीय पक्षामार्फत महानगरपालिका प्रशासन व शासनाचे लक्ष वेधल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये गेले अनेक वर्षापासून बाह्य यंत्रणेद्वारे कार्यरत असलेल्या ठेका कर्मचाऱ्यांची तसेच, स्थानिक उमेदवारांना प्रधान्य न देण्याची अट नमूद नसल्याने कर्मचाऱ्यांवर व स्थानिक उमेदवारांवर अन्याय होणार असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांना दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त निवेदनाच्या अनुषंगाने ठेका व कंत्राटी कर्मचारी आणि स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) शासनाच्या विविध आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळ सेवेने भरण्याबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सूचना दिनांक ४.०५.२०२२ व दिनांक २१.११.२०२२ निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(२), (३), (४) व (५) वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर बाह्य यंत्रणेद्वारे व कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून सद्यस्थितीत बाह्य यंत्रणेद्वारे १८२० व वैद्यकीय आरोग्य विभागात कंत्राटी पध्दतीने ९३१ कर्मचारी कार्यरत असल्याचे वसई - विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व स्थानिकांना महानगरपालिकेची पद भरती करताना प्राधान्य देण्याबाबतचे लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग यांच्या शासन परिपत्रक दिनांक २५.०८.२००५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातून बारमाही वाहणाऱ्या जगबुडी नदीत मोठया प्रमाणात प्रदुषण होत असल्याबाबत

**(४७) ६२९३५ (१२-०५-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातून बारमाही वाहणाऱ्या जगबुडी नदीच्या पात्रात कचरा फेकणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीत तरंगणाऱ्या कचऱ्यासह प्लॅस्टीकमुळे जगबुडी नदीपात्राला बकाल स्वरुप आल्याने तसेच प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नदीमध्ये रात्रीच्या वेळेस विविध प्रकारचा कचरा फेकत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन नदीचे प्रदुषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) खेड नगरपरिषदेच्या क्षेत्रातील जगबुडी नदी ही खाडी असून त्यास भरती व ओहोटीचे पाणी येत असल्याने भरतीच्या वेळी काही प्रमाणात भरतीच्या पाण्याबरोबर तरंगणारा कचरा दिसून येतो. त्यामुळे नदीचा काही भाग बकाल दिसतो, ही वस्तूस्थिती आहे.
(३) हे खरे आहे.
(४) नगरपरिषदेच्या हद्दीतील नदी परिसरात कचरा टाकू नये म्हणून अल-सफा फाऊंडेशन, खेड ही सेवाभावी संस्था व नगरपरिषदेमार्फत जनजागृती करण्यात येत आहे. अशा प्रकारचा कचरा टाकू नये व त्यावर अंकुश रहावा म्हणून नगरपरिषदेने दोन कर्मचारी नदी पात्रात देखरेखीसाठी नियुक्त केले आहे. तसेच नदी पात्राचे पाणी प्रदुषित होऊ नये म्हणून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी नविन विकास आराखडयामध्ये जागा आरक्षित केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील बसगाडीला अचानक आग लागल्याबाबत

**(४८) ६३२६४ (१२-०५-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील बसगाडीला माहे जानेवारी, २०२३ मध्ये अचानक आग लागल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टीएमटीच्या अनेक बसगाड्यामध्ये बसवण्यात आलेली आग प्रतिबंधक यंत्रणा ही कालबाह्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन उक्त बसेसमधील आग प्रतिबंधक उपकरणे कालबाह्य झाल्यानंतरही नवीन उपकरणे बसविण्यास टाळाटाळ करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर वा महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार ठाणे परिवहन सेवेच्या बस ताफ्यातील (जी.सी.सी.) तत्वावर खाजगी ट्रॅव्हल्समार्फत चालविण्यात येणाऱ्या एका बसला दिनांक ०९.०१.२०२३ रोजी आग लागल्याची घटना घडली होती.
(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार उपरोक्त दुर्घटनाग्रस्त बसची तांत्रिक तपासणी केली असता, बॅटरी ते स्ट्रार्टर मेन केबल शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली होती तथापि, पुरवठादाराकडील रिफिलिंग दाखल्यानुसार सदरची आग प्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत व वापरण्यासाठी योग्य होती.
दरम्यान भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी येथील निराधार अनुदानाच्या योजनांना तातडीने मंजुरी देणेबाबत.

**(४९) ६३२८२ (२५-०४-२०२३). श्री .सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील निराधार अनुदानाच्या योजनांचे प्रस्ताव अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी मिळावी, यासाठी काही नागरीकांनी मा.जिल्हाधिकारी यांना

दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी निवेदन देऊन उपोषण करून निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदरील प्रस्तावांना तातडीने मंजूरी देऊन लाभार्थींना लाभ देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
परभणी जिल्हयात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये वेळोवेळी बैठकीचे आयोजन करुन ६८३२ अर्जांना मंजूरी देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेमध्ये गेल्या १८ वर्षांपासून कंत्राटी पध्दतीने सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी रुजू करून घेण्याबाबत

**(५०) ६३५१३ (१२-०५-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेमध्ये गेल्या १८ वर्षांपासून कंत्राटी पध्दतीने सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी रुजू करून घेणेबाबतची मागणी कंत्राटी कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत रुजू करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग यांच्या शासन परिपत्रक दिनांक २५.०८.२००५ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक असून प्राप्त निवेदनावर आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यास ठाणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.